मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# स्थानिक स्वराज्य संस्था जिंकण्यासाठी भाजपचा असा आहे मास्टर प्लॅन

## भाजपने संविधानाचा जागर करणाच्या दृष्टिकोनातून पावलं उचलली आहेत. : भाजपने संविधान गौरव अभियान सुरू केला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकी नंतर आता सर्वच राजकीय पक्ष हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मोर्चे बांधणीला लागले आहेत. महाविकास आघाडीतील मित्रपक्ष विधानसभेचा पराभव मागे टाकून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवण्याची तयारी करीत आहेत. तर दुसरीकडे महायुतीतील मित्रपक्ष विधानसभा निवडणुकीमध्ये केलेली विजयी घोडदौड कायम ठेवण्याच्या प्रयत्नात आहेत.




या दृष्टिकोनातून राजकीय पक्षाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सामोरे जाण्यापूर्वी विविध मास्टर प्लॅन आखण्यात येत आहेत. विधानसभा निवडणुकीत ज्या पद्धतीने भाजपने एक मोठा ऐतिहासिक विजय साकार केला. त्याच पद्धतीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत देखील असाच मोठा विजय मिळवण्याच्या दृष्टिकोनातून भाजप कामाला लागली आहे. जी रणनीती विधानसभा निवडणुकीत आखण्यात आली होती त्याच पद्धतीचे रणनीती स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आखण्यास सुरुवात केली आहे.

लोकसभा निवडणुकीमध्ये विरोधकांनी केंद्रामध्ये पुन्हा भाजपचा सरकार आल्यानंतर संविधान बदलणार असल्याचा प्रचार केला. याचा मोठा फटका महायुतीला लोकसभा निवडणुकीमध्ये बसला.

लोकसभा निवडणुकीचा अनुभव गाठीशी ठेवून महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत विरोधकांनी संविधानाबाबत फेक नरेटीव पसरवला असल्याचे सांगत भाजपने संविधानाचा जागर केला. त्या रणनीतीचा फायदा देखील भाजपला विधानसभाच्या निवडणुकीत झाल्याचे पाहायला मिळालं. आता विधानसभा निवडणुकींनतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला सामोरे जाताना पुन्हा एकदा भाजपने संविधानाचा जागर करणाच्या दृष्टिकोनातून पावलं उचलली आहेत. भाजपने संविधान गौरव अभियान सुरू केला आहे.

संविधान गौरव अभियान प्रदेश समितीच्या महाराष्ट्र संयोजकपदी आमदार अमित गोरखे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्यासह सहसंयोजक प्रदेश उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम, सहसंयोजक शशीकांत कांबळे, सहसंयोजक प्रेरणा होनराव, सहसंयोजक अमित घुगे हे या टीममध्ये असतील.

अमित गोरखे म्हणाले, "राज्यभर 'संविधान गौरव अभियान' राबवणार आहोत. या अभियानात सर्व राज्यांच्या जिल्हा मुख्यालयात दौरे केले जाणार आहेत. विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून मूळ उद्देश हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान यांचे महत्व जनमानसात शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून त्यांना राष्ट्र विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेणे हाच आहे,"

# लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप हे फक्त नाव नसून समाजासाठी प्रेरणादायी अध्याय : चंद्रकांत पाटील

## पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासाची दूरदृष्टी ठेवत लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या स्मृतींना अर्पण करण्यात येणाऱ्या 'शक्तिस्थळ' प्रकल्पाचे भूमिपूजन समारंभात ते बोलत होते

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्वर्गीय लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप हे फक्त नाव नसून समाजासाठी प्रेरणादायी अध्याय आहेत. त्यांनी निष्ठा, सामर्थ्य, आणि सेवाभावाने समाजाच्या विकासासाठी आयुष्य वेचले होते, असे गौरवोद्गार उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज (शनिवारी) काढले.



पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासाची दूरदृष्टी ठेवत लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या स्मृतींना अर्पण करण्यात येणाऱ्या 'शक्तिस्थळ' प्रकल्पाचे भूमिपूजन समारंभात ते बोलत होते. त्यावेळी केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, माजी मंत्री आमदार डॉ.तानाजीराव सावंत, मावळ लोकसभा खासदार श्रीरंग बारणे, पुणे महापालिका शिक्षण मंडळाचे माजी उपाध्यक्ष विजयआप्पा रेणुसे, भोसरी विधानसभा आमदार महेशदादा लांडगे, पिंपरी विधानसभा आमदार अण्णा बनसोडे, भोर विधानसभा आमदार शंकर मांडेकर, मावळ विधानसभा आमदार सुनील शेळके, विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे तसेच कार्यक्रमाचे निमंत्रक माजी आमदार अश्विनी जगताप, आमदार शंकर जगताप, गोसेवक विजूशेठ जगताप तसेच अनेक मान्यवर पदाधिकारी, जगताप परिवाराचे नातेवाईक कार्यकर्ते, लक्ष्मणभाऊंबरोबर काम केलेले सर्व जुने सहकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी प्रकल्पाला शुभेच्छा देत सांगितले की, "शक्तिस्थळ हा प्रकल्प समाजाच्या उन्नतीसाठी एक प्रेरणादायी संदेश ठरेल. हा प्रकल्प पिंपरी-चिंचवड शहराला एक नवीन ओळख मिळवून देईल."

पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासाची दूरदृष्टी ठेवत लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या स्मृतींना अर्पण करण्यात येणाऱ्या "शक्तिस्थळ" प्रकल्पाद्वारे निष्ठा, सामर्थ्य, सेवाभाव आणि दातृत्वाचे प्रतीक असलेल्या लक्ष्मणभाऊंच्या स्मृती जपण्याबरोबरच भावी पिढ्यांना प्रेरणा देणे हा उद्देश आहे. या प्रकल्पामध्ये युवकांसाठी अभ्यासिका, सांस्कृतिक प्रदर्शन, आणि प्रेरणादायी स्मृती स्थळ यांचा समावेश असेल. या माध्यमातून समाजसेवेचा संदेश देणारे स्मारक उभारण्याचा संकल्प जगताप परिवार व लक्ष्मणभाऊंच्या मित्रपरिवाराने केला आहे.

भूमिपूजन समारंभात उपस्थित असलेल्या नागरिकांनी लक्ष्मणभाऊंच्या स्मृतींना श्रद्धांजली वाहली. 'शक्तिस्थळ' हा केवळ प्रकल्प नसून, समाजातील प्रत्येक घटकाला एकत्र जोडणारा पूल ठरणार आहे. हे स्मारक समाजासाठी उर्जेचे स्थळ आणि प्रेरणेचा स्रोत ठरेल, असा विश्वास सर्व मान्यवरांनी व्यक्त केला.

माजी महापौर सौ.माई ढोरे, भाजपा कार्यकारी शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे, राष्ट्रवादी पक्षाचे नेते विठ्ठल उर्फ नाना काटे, कार्यसिद्धी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गिरीराज सावंत, माजी नगरसेवक प्रशांत शितोळे, मोरेश्वर भोंडवे, बापू भेगडे, पै.हनुमंत गावडे, संदीप जाधव, उमेश चांदगुडे, हभप पंकज महाराज गावडे, जयदीप खापरे तसेच सर्व माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि लक्ष्मणभाऊंवर नितांत प्रेम करणारे सर्व बंधू-भगिनी आवर्जून उपस्थित होते.

# राज्यात महापालिका निवडणुका कधी? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी 'ती' वेळच सांगितली!

## राज्यातील महापालिका निवडणुका रखडल्या आहेत. यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी वक्तव्य केले आहे.



**पुणे | प्रतिनिधी**

शिर्डी येथे झालेल्या भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) महाराष्ट्र अधिवेशनाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हजेरी लावली. या अधिवेशनात अमित शाहांचीही उपस्थिती होती. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी संवाद साधला आहे. यात त्यांनी महापालिका निवडणुकीवर भाष्य केले आहे. तर विरोधकांवर जोरदार निशाणा साधला आहे.

या कार्यक्रमाला राज्यभरातून भाजप नेते, पक्ष कार्यकर्ते आणि समर्थक जमले होते. राज्यात पक्षाचे अस्तित्व बळकट करणे, तळागाळातील कार्यकर्त्यांशी संपर्क साधणे आणि आगामी निवडणुकीसाठी महत्त्वाच्या राजकीय चर्चेत गुंतणे हा या अधिवेशनाचा उद्देश होता. देवेंद्र फडणवीस यांचा सहभाग हा पक्षासाठी महत्त्वाचा क्षण होता.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, वोट जिहाद भाग २ म्हणून बांगलादेशी घुसखोर महाराष्ट्रात जन्म प्रमाणपत्रे मागत आहेत. नाशिकमधील अमरावती आणि मालेगाव तालुक्यात अशी जवळपास १०० प्रकरणे समोर आली आहेत. हे लोक, अनेक सुमारे 50 वर्षे वयाचे, बेकायदेशीरपणे कागदपत्रे मिळवत आहेत. एकाही घुसखोराला महाराष्ट्रात राहू दिले जाणार नाही.

महायुती सरकार जाती-आधारित आणि सांप्रदायिक विभाजन निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अराजकतावादी शक्तींचा मुकाबला करण्यासाठी वचनबद्ध आहे. लोकांना जागृत राहण्याचे आवाहन केले आणि हा संकल्प अधिक मजबूत होईल याची खात्री केली. नोव्हेंबरच्या विधानसभा निवडणुकीतील भाजपच्या उत्कृष्ट कामगिरीवर प्रतिबिंबित करून, त्यांनी लोकसभा निवडणुकीत झालेल्या अपयशानंतर पक्ष कार्यकर्त्यांमध्ये मार्गदर्शन आणि आत्मविश्वास निर्माण केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे कौतुक केले.

येत्या काही महिन्यांत राज्यभरात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर ते म्हणाले, "आपण तयार आणि एकजूट राहिले पाहिजे. 'एक हैं ते सुरक्षित हैं' या पंतप्रधानांच्या मंत्राने आम्हाला मार्गदर्शन केले पाहिजे. मुंबई, ठाणे आणि नागपूरसह अनेक नागरी संस्थांच्या निवडणुका 2022 च्या सुरुवातीपासून प्रलंबित आहेत. ओबीसी कोट्याबाबत न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून येत्या तीन ते चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात येतील. त्यांनी भाजप कार्यकर्त्यांना पुन्हा निवडणुकीच्या तयारीला लागण्यास सांगितले. आम्हाला नवीन आव्हाने स्वीकारायची आहेत आणि विधानसभा निवडणुकीच्या यशावर विसंबून नाही, असं फडणवीस म्हणाले.

ते म्हणाले की, महाराष्ट्रात गेल्या 30 वर्षांत भाजप हा एकमेव पक्ष आहे ज्याने सलग तीन निवडणुकांमध्ये (2014, 2019 आणि 2024) 100 जागांचा टप्पा ओलांडला आहे. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाने आम्हाला आत्मविश्वास दिला आणि भाजपला 89 च्या स्ट्राइक रेटने 132 जागा मिळाल्या. कौरवांवर पांडवांचा विजय कोणी निश्चित केला याबद्दल महाभारतातील एक किस्सा सांगताना फडणवीस म्हणाले की, विधानसभेत भाजपच्या शानदार विजयात पक्षाचे कार्यकर्ते "केशव" होते आणि मोदी "माधव", भगवान कृष्णाची दोन्ही नावे होती.

# पिंपरी-चिंचवडमध्येही आरोपींना वाचवण्याचा 'बीड पॅटर्न'

## पिंपरीतील रिक्षा चालकाच्या मृत्यूला कारणीभूत असलेल्या दोन आरोपींना चार दिवसांत जामीन मिळाला आहे. तर दोन आरोपी अद्याप फरार आहेत.



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरीतील रिक्षा चालकाच्या मृत्यूला कारणीभूत असलेल्या दोन आरोपींना चार दिवसांत जामीन मिळाला आहे. तर दोन आरोपी अद्याप फरार आहेत.

पिंपरीतील रिक्षा चालकाच्या मृत्यूला कारणीभूत असलेल्या दोन आरोपींना चार दिवसांत जामीन मिळाला आहे. तर दोन आरोपी अद्याप फरार आहेत. पोलिस प्रशासनाच्या आशीर्वादाने आरोपी फरार असल्याचे दिसते; तर अटक गुन्हेगारांना तत्काळ जामीन मिळण्याचा 'बीड पॅटर्न' शहरात पाहायला मिळाला, अशी टीका रिक्षा पंचायतच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

रिक्षा पंचायतीचे सरचिटणीस नितीन पवार, पिंपरी-चिंचवड विभाग प्रतिनिधी अशोक मिरगे, काशिनाथ शेलार अंगणवाडीच्या पिंपरी-चिंचवडच्या नेत्या शैलजा चौधरी, हमाल पंचायतीचे चिंचवड मालधक्का प्रमुख महादेव तिपाले यांनी दिवंगत रिक्षाचालक राजू राजभर यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. रिक्षा पंचायतीच्यावतीने त्यांना आर्थिक मदत दिली.

संघटनेच्यावतीने दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे की, रिक्षाचालक राजभर यांनी कर्ज परतफेडीसाठी कसा दबाव येतो ? कुटुंबियांना कसा त्रास दिला जातो ? याबद्दल लेखी पत्र लिहिले आणि व्हिडिओद्वारे सांगितले आहे. इतका ठोस पुरावा असतानाही आरोपी जामिनावर सुटले आहेत. इतर दोन आरोपी या संवेदनशील प्रकरणात अद्याप फरार आहेत.

वास्तविक, सदर गुन्ह्यात सत्र न्यायालयात आणि तेही दीर्घ काळानंतर जामीन मिळतो. मात्र या प्रकरणात प्रथम वर्ग न्यायालयाने आपला अधिकार वापरून दोघांनाही जामीन दिला आहे. तो देत असताना पोलिस आणि सरकारी वकील यांनी जामिनाला ठामपणे विरोध करायला हवा होता, तो उपलब्ध कागदपत्रांवर दिसत नाही.

पोलिसांनी तातडीने आरोपींचा जामीन रद्द करण्यासाठी पावले उचलावीत. तसेच दोन फरार आरोपींना तत्काळ अटक करून पुढील तपासासाठी ताब्यात घ्यावे, अशी मागणी पंचायतीच्यावतीने करण्यात आली. नजीकच्या काळात राजू राजभर याला न्याय न मिळाल्यास रिक्षा पंचायतीचे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव व सरचिटणीस नितीन पवार यांच्या नेतृत्वाखाली रिक्षा पंचायत आंदोलन केल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा पंचायतीचे सरचिटणीस नितीन पवार व मार्गदर्शक मानव कांबळे यांनी दिला आहे.

# प्रशासक मांडणार सलग तिसरा अर्थसंकल्प

**सध्या 2025-26चा अर्थसंकल्प तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे, फेब्रुवारीत अर्थसंकल्प स्थायी समिती समोर सादर केला जाण्याची शक्यता आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

उद्योगनगरी पिंपरी-चिंचवडच्या विकासात महापालिकेचा मोलाचा वाटा आहे. मात्र, विविध कारणांनी निवडणुका लांबल्याने लोकप्रतिनिधींऐवजी प्रशासकांच्या हाती तीन वर्षांपासून कारभार आहे. त्यामुळे शहराच्या प्रगतीची गती दर्शविणारा महापालिकेचा सलग तिसरा अर्थसंकल्प प्रशासक मांडणार असून तेच स्थायी समिती अध्यक्ष व सर्वसाधारण सभेचे पीठासन अधिकारी म्हणून तेच मंजूरही करणार आहेत.

महापालिकेचा अर्थसंकल्प म्हणजे पुढील वर्षभरात होणाऱ्या शहराच्या विकासाचा आरसा असतो. साधारणपणे अर्थसंकल्प तयार करण्याचे काम सप्टेंबरपासून सुरू होते. त्यामध्ये दहा लाखापर्यंतची कामे सामान्य नागरिकांनाही सुचविता येतात. त्यांची पडताळणी होऊन आवश्यक असलेल्या कामांचा समावेश अर्थसंकल्पात केला जातो. शिवाय, आठही प्रभाग स्तरावरील कामांचा समावेशही त्यामध्ये असतो. त्यासाठी स्वतंत्र तरतूद असते. सध्या २०२५-२६चा अर्थसंकल्प तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. फेब्रुवारीत अर्थसंकल्प स्थायी समिती समोर सादर केला जाण्याची शक्यता आहे. मात्र, त्यामध्ये कोणते नवीन प्रकल्प असतील, सध्या सुरू असलेल्या प्रकल्पांसाठी किती तरतूद असेल, याची माहिती असेल.



### यापूर्वीचे अर्थसंकल्प

» लोकनियुक्त प्रतिनिधींची मुदत संपण्यापूर्वी अर्थात फेब्रुवारी २०२२ मध्ये तत्कालीन स्थायी समिती कारभाऱ्यांनी आयुक्तांकडून २०२२-२३ चा अर्थसंकल्प स्वीकारला होता. मात्र, त्याची अंमलबजावणी प्रशासक म्हणून आयुक्तांनीच केली होती. २०२३-२४ चा अर्थसंकल्प प्रशासक शेखर सिंह यांनीच मांडला व स्वीकारला होता. आता सलग तिसरा अर्थात २०२४-२५ चा अर्थसंकल्प आयुक्त शेखर सिंह मांडणार असून, स्थायी समिती अध्यक्ष म्हणून स्विकारणारही आहेत.

### अर्थसंकल्पाची वाटचाल

» महापालिकेच्या लेखा व वित्त विभागाकडून अर्थसंकल्प निर्मितीची प्रक्रिया सुरू होते. त्यासाठी विविध विभाग व क्षेत्रीय कार्यालयांकडून माहिती मागवली जाते. सर्व माहिती संकलित झाल्यानंतर स्थायी समितीला अर्थसंकल्प सादर केला जातो. स्थायी समितीमध्ये त्यावर चर्चा होते. स्थायीचे सदस्य काही हरकती व सूचना सुचवितात. त्यांचा समावेश करून अंतिम अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेत मांडला जातो. सभेची मंजुरी मिळाल्यानंतर एक एप्रिलपासून अर्थसंकल्पाची अंमलबजावणी केली जाते.

### अर्थसंकल्पाची वाटचाल

» महापालिकेमध्ये २०१७ मध्ये निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींची मुदत १३ मार्च २०२२ रोजी संपली आहे. कोरोना काळातील प्रतिबंध, ओबीसी आरक्षणाचा तिढा, बदललेली राजकीय परिस्थिती अशा विविध कारणांनी वेळेत अर्थात निवडणूक होऊ शकली नाही. परिणामी, १४ मार्च २०२२ पासून राज्य सरकारने आयुक्तांचीच प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे. स्थायी समिती अध्यक्षपद आणि सर्वसाधारण सभा पीठासन अधिकारीपदही त्यांच्याकडेच आहे. त्यामुळे २०२५-२६चा अर्थसंकल्पही प्रशासकच स्वीकारतील.

### दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प (कोटी रुपयांत)

| वर्ष | रक्कम | केंद्र-राज्य अनुदानासह |
|---|---|---|
| २०२२-२३ | ४९६१ | ६४९७ |
| २०२३-२४ | ५२९८ | ७१२७ |
| २०२४-२५ | ५४८१ | ८६७६ |
| २०२५-२६ | उत्सुकता | उत्सुकता |

# वाकड ते देहूरोडदरम्यान नवा सर्व्हिस रोड; नव्या रस्त्यामुळे वाहतूक कोंडीपासून नागरिकांची होणार सुटका

**या रस्त्याच्या कामासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी पुढाकार घेतला आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे-मुंबई महामार्गावर वाकड ते देहूरोड या दरम्यान २४ मीटर रुंदीचा नवा सर्व्हिस रोड तयार करण्यात येणार आहे. या रस्त्याच्या कामासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे नागरिकांची वाहतूक कोंडीतून मुक्तता होण्यास निश्चित मदत होणार आहे.



पुणे-मुंबई महामार्गावर वाकड ते देहूरोड या दरम्यान २४ मीटर रुंदीचा नवा सर्व्हिस रोड तयार करण्यात येणार आहे. या रस्त्याच्या कामासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे नागरिकांची वाहतूक कोंडीतून मुक्तता होण्यास निश्चित मदत होणार आहे.

चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी निवडणुकीत दिलेल्या वचनांची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. पुणे-बंगळुरू महामार्गावर वाकड ते देहूरोड दरम्यान २४ मीटर रुंदीचे नवीन सर्व्हिस रोड तयार करण्याच्या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया राबवण्यास सुरुवात झाली आहे.

वाकड ते देहूरोड दोन्ही बाजूचे सर्व्हिस रोड उभारणी करण्यात येणार आहे. वाकड ते देहूरोड दरम्यान दोन्ही बाजूंना २४ मीटर रुंदीचे रस्ता विकसित होणार आहे. हे रस्ते अत्याधुनिक सुविधा, अर्बन स्ट्रीट डेव्हलपमेंट आणि वाहतूक व्यवस्थापन प्रणालीचा वापर करून या रस्त्यांवर सोयी सुविधा उभारल्या जाणार आहेत. या रस्त्यामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत मिळणार आहे.

या रस्त्यांमुळे वाकड ते देहूरोड दरम्यान वाहतूक कोंडीपासून नागरिकांना कायमस्वरूपी मुक्तता मिळेल. या प्रकल्पामुळे वाहनचालकांची सोय होणार असून महामार्गावरील वाहतूककोंडी आणि अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. हा प्रकल्प चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल, असे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. पुणे-मुंबई महामार्गावर वाकड ते देहूरोड या दरम्यान २४ मीटर रुंदीचा नवा सर्व्हिस रोड तयार करण्यात येणार आहे त्यामुळे नागरिकांची वाहतूक कोंडीतून मुक्तता होण्यास निश्चित मदत होणार आहे..

> निवडणुकीत दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. वाकड ते देहूरोड दरम्यान होणाऱ्या या प्रकल्पामुळे नागरिकांना होणाऱ्या अडचणी कमी होतील आणि परिसराच्या विकासाला चालना मिळेल. यासाठी नितीन गडकरी यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे.
>
> - शंकर जगताप, आमदार, चिंचवड

# केंदूर-पाबळ झेडपी गटात इच्छुकांची तयारी

## आगामी दीड महिन्यात जिल्हा परिषदांच्या निवडणुकीचे रणशिंग फुंकले जाण्याची शक्यता ;उमेदवारीसाठी चाचपणी : सार्वजनिक कार्यक्रमांची रेलचेल

पुणे | प्रतिनिधी

आगामी दीड महिन्यात जिल्हा परिषदांच्या निवडणुकीचे रणशिंग फुंकले जाण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने सर्वच राजकीय पक्षांची तयारी सुरू झाली असून नुकतेच शिरूर- आंबेगावचे लोकप्रतिनिधी दिलीप वळसे पाटील यांनी जातेगाव येथील कार्यक्रमात यांचे सुतोवाच केले आहे.दरम्यान, शिरूर- आंबेगाव विधानसभा मतदारसंघातील आठ जिल्हा परिषदांपैकी केंदूर- पाबळ या गटाचे निवडणुकीत विविध पक्षांचे विविध उमेदवार तयारी करत असल्याने प्रमुख पक्षांची युती असलेल्या उमेदवारांमध्ये विशेष करून भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट राष्ट्रवादी या पक्षांमध्ये मोठी चुरशीची लढाई होण्याची चिन्हे दिसत आहे.

सातारा येथे झालेल्या पक्ष बैठकीत यासंबंधी शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांनी यापुढील निवडणुकांबाबत भाष्य केले असल्याने युतीच्या विरोधात शरद पवार गट मोठी लढत देऊ शकतो, अशी चर्चा या मतदारसंघात सुरू आहे. दरम्यान, शिरूर- आंबेगाव विधानसभा मतदारसंघाचे सर्वेसर्वा दिलीप वळसे पाटील यांची ही भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. त्यांच्या विजयात शिवसेना आणि भाजप या दोन पक्षांचा मोठा सहभाग असल्याने या गटातील उमेदवारी कोणाला मिळेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पाबळ- केंदूर जिल्हा परिषद गटात पाबळ आणि केंदूर ही दोन गावे मतदानात मोठी असली तरी इतर गावांचाही मतदानात सहभाग असल्याने उमेदवारीची मागणी मोठ्या प्रमाणात होऊ शकते. पूर्वी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे एकमेव प्राबल्य असलेल्या या मतदारसंघात यावेळी वळसे पाटलांचे प्रतिस्पर्धी उमेदवार देवदत्त निकम यांनी मोठे आव्हान निर्माण केले आहे. याच पार्श्वभूमीवर येणाऱ्या निवडणुकीत येणारे आरक्षण महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे चित्र पुढे येत आहे तर विद्यमान राष्ट्रवादी आणि राष्ट्रवादी शरद पवार गट या दोन्ही गटांमध्ये आपले अस्तित्व दाखवणारे उमेदवार यावेळी उमेदवारासाठी जास्त जोर लावण्याची शक्यता दिसत आहे.

या दृष्टीने माजी जिल्हा परिषद सदस्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे तर नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत फुटी मुळे विभागलेल्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांची भूमिका तितकीच महत्त्वाची ठरणार आहे याबाबतीत सर्वे करून निर्णय घेतला जाईल अशी भूमिका नामदार वळसे पाटील यांनी यापूर्वी जाहीर केलेली आहे अशा परिस्थितीत तीन पक्षांची मनस्थिती सांभाळून तब्बल आठ मतदारसंघात उमेदवार निवडण्याची कौशल्य तिन्ही पक्षांच्या नेतेमंडळींना करावे लागणार असल्याची बाब पुढे येत आहे. विविध पक्षांचे विविध उमेदवार तयारी करत असल्याने प्रमुख पक्षांची युती असलेल्या उमेदवारांमध्ये विशेष करून भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट राष्ट्रवादी या पक्षांमध्ये मोठी चुरशीची लढाई होण्याची चिन्हे दिसत आहे.




### प्रबळ, प्रस्थापितांकडून मोर्चेबांधणी

» पाबळ- केंदूर मतदारसंघात पाबळ येथील माजी जिल्हा परिषद सदस्य नंदकुमार पिंगळे, माजी सरपंच मारुती शेठ शेळके, योगेश चौधरी तर हिवरे येथून विकास गायकवाड, खैरेनगर येथून एकनाथ खैरे, करंदी येथून शंकर जांभुळकर तर केंदूरमधून सनी थिटे, प्रमोद पऱ्हाड आणि जातेगाव येथून प्रकाश पवार व धामारी येथून नंदकुमार गायकवाड आदी प्रबळ उमेदवार उमेदवारीसाठी प्रयत्नशील असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

### शरद पवार गटांकडून तयारी

» गतवर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत शरद पवार गटाला दहापैकी आठ जागा मिळवून चांगले यश मिळाले. विधानसभा निवडणुकीत शरद पवार गटाला अनपेक्षित अपयशाला सामोरे जावे लागले. तरी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी लक्ष घातल्यास पुन्हा एकदा जिल्हा परिषदेची निवडणूक ही हातघाईवर येण्याचे संकेत आहेत. या झेडपी गटात शरद पवार गटाचे उमेदवार देवदत्त निकम यांनी तुल्यबळ लढत दिली होती. तसेच मते खेचून आणली आहे. त्यामुळे वळसे पाटील यांचा स्थानिक गट बॅकफूटवर गेला आहे. विधानसभा निकालानंतर वळसे पाटील यांनी या गटात डागडुजी करीत बुरूज पुन्हा सुस्थितीत आणला आहे.

# सोमेश्वरच्या प्रश्नाबाबत संचालक मंडळाशी पुन्हा चर्चा : खासदार सुप्रिया सुळे

## यावर्षीच्या पहिल्या उचलीबाबत सभासदांमध्ये असलेल्या नाराजीचे वातावरण, अशी विविध प्रश्नांवर खासदार सुप्रिया सुळे यांनी सोमेश्वर कारखान्यास भेट दिली.

पुणे | प्रतिनिधी

सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या एमएसपीचा प्रश्न, साखर निर्यातीची मागणी, नदीच्या पाण्याचे कारखान्यांमुळे होणारे प्रचंड प्रदूषण, यावर सर्व कारखान्यांनी एकत्रित होऊन मार्ग काढवा तसेच तसेच यावर्षीच्या पहिल्या उचलीबाबत सभासदांमध्ये असलेल्या नाराजीचे वातावरण, अशी विविध प्रश्नांवर खासदार सुप्रिया सुळे यांनी शनिवारी (दि.११) सोमेश्वर कारखान्यास भेट दिली. मात्र, यावेळी चेअरमन, संचालक मंडळ उपस्थित नव्हते. त्यामुळे सभासदांच्या प्रश्नाबाबत पुन्हा सोमेश्वरच्या चेअरमन व संचालक मंडळाला पत्र देऊन लवकरच चर्चा करणार असल्याचे खासदार सुळे यांनी पत्रकारांना सांगितले.



बारामती तालुक्यातील सोमेश्वर व माळेगाव सहकारी साखर कारखान्याने उसाची पहिली उचल २८०० रुपये दिली आहे. सभासदांच्या आग्रहास्तव बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी राष्ट्रीय राजकारणातून उडी घेत बारामती लोकसभा मतदारसंघात येत असलेल्या साखर कारखानदारीच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी सोमेश्वर कारखान्यावर शनिवारी (दि.११) दाखल झाल्या.

सोमेश्वर कारखान्याची गेल्यावर्षीची पहिली उचल आणि आत्ताची उचल यामध्ये बरीच तफावत असल्याने सोमेश्वरमधील सभासद देखील नाराज असल्याची चर्चा कारखाना कार्यस्थळावर होती. काही सभासदांनी खासदार सुप्रिया सुळे यांच्याशी चर्चा केल्यानंतर सभासदांच्या आग्रहाखातर सुळे यांनी कारखाना प्रशासनाशी चर्चा करण्यासाठी व कारखान्याला एमएसपी, साखर निर्यात तसेच कारखान्यांचे नद्यांत होणारे प्रदूषण याची माहिती जाणून घेण्यासाठी कारखाना कार्यस्थळाला भेट दिली.

यावेळी युगेंद्र पवार, राजेंद्र जगताप, प्रदीप शेंडकर, प्रदीप कणसे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे कार्यकर्ते व सोमेश्वर कारखान्याचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यातील काही सभासदांनी खा.सुळेंना विनंती केली की कारखान्याचे एमडी यांच्याशी चर्चा करण्याबरोबरच कारखान्याचे चेअरमन व संचालक मंडळ यांच्याशी देखील चर्चा करण्यात यावी. कार्यकर्त्यांच्या विनंतीला मान देऊन कारखाना प्रशासनास त्यांच्या वतीने तसे पत्र दिले.

### खासगी वारकरी शिक्षण संस्थांची संख्या 165 वर

» नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत आलेल्या अपयशामुळे खासदार सुळे यांच्या या दौऱ्याला महत्त्व प्राप्त झाले होते. कारखाना प्रशासनाने पहिली उचल २८०० रुपये दिली. त्याबाबत पहिली उचल वाढवून देता येते का, याबाबत निवडक सभासदांना घेऊन खासदार सुळे यांनी कारखान्याचे एम. डी. राजेंद्र यादव यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली. यावेळी युगेंद्र पवार, राजेंद्र जगताप यांच्यासह सोमेश्वरचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.